**वाचले :-**

१. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम २०११ मधील सुधारीत तरतूदी.

२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दिनांक ०७ मे, २०२१

३. पदोन्नती समिती सभा दि.०४/१०/२०२४ चा सभावृत्तांत.

४. मा.प्रशासक यांचेकडील मा. महापालिका सभा ठराव क्र.७५८, दि. ०८/१०/२०२४

५. सामान्य प्रशासन विभागाकडील दि. ११/१०/२०२४ रोजीचा प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.
सामान्य प्रशासन विभाग
क्र. साप्रवि/२/कावि/६७०/२०२४
दिनांक : ११/१०/२०२४

**विषय :- 'सहाय्यक आयुक्त' पदावर पदोन्नतीबाबत.**

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर **'सहाय्यक आयुक्त'** अभिनामाची **१४** पदे **पे लेवल S-२० वेतनश्रेणी ५६१००-१७७५००** या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. या संवर्गामधील महानगरपालिका सेवेतील अधिका-यांकरिता रिक्त असलेली पदे पदोन्नतीने भरण्याकामी दि.०४/१०/२०२४ रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आली होती.

प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने महाराष्ट्र शासन राजपत्र, दि. १८ फेब्रुवारी २०२० मधील नियमातील परिशिष्ट (३) नियम १०.२ नुसार विभागीय परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देवून पदोन्नतीपूर्व **'प्रशासन अधिकारी'** पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, सेवाज्येष्ठता, गोपनीय अहवाल, संगणक अर्हता, मत्ता व दायित्व, आणि शिस्तभंग विषयक कारवाई इत्यादी सेवाविषयक तपशिल पडताळून, खालील अधिका-यांना पदोन्नती संदर्भात मा.उच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेल्या सर्व याचिका तसेच दिनांक ०७/०५/२०२१ चे शासन निर्णयाचे अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार **'सहाय्यक आयुक्त'** पदावर **पे.लेवल S-२० वेतनश्रेणी ५६१००-१७७५००** या वेतनश्रेणीत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण चार- कलम ४५ (२) मधील अंतर्भूत तरतुदींनुसार कलम ४५ (४) अन्वये मा.महानगरपालिके मार्फत केलेली प्रत्येक नेमणूक (राज्य) शासनाकडून कायम करण्याच्या अधीन पदोन्नती देण्यास शिफारस केली आहे.

| **अ.क्र** | **अधिकारी नाव** | **पदोन्नतीचा प्रवर्ग** |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | मोरे नाना जयवंत | ज्येष्ठतेनुसार |

मा.प्रशासक यांचेकडील मा.महापालिका सभा ठराव क्र.७५८ , दिनांक ०८ /१०/२०२४ अन्वये उपरोक्त अधिकारी यांना **सहाय्यक आयुक्त** पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

सबब, मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका पदोन्नतीमधील आरक्षण रद्द करण्यासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ठ असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ मध्ये होणारा अंतिम निर्णय व शासन निर्णय दि.०७/०५/२०२१ चे अधिन तसेच सदर पदोन्नती मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील प्रलंबित असलेल्या रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०८७६/२०२१, रिट पिटीशन क्र.(स्टॅम्प) क्र.१०८७८/२०२१ तसेच रिट पिटीशन (स्टॅम्प) क्र.१०९०९/२०२१ मध्ये होणा-या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून उपरोक्त नमुद अधिकारी यांना **'सहाय्यक आयुक्त'** पदावर **पे.लेवल S-२० वेतनश्रेणी ५६१००-१७७५००**या वेतनश्रेणीमध्ये निव्वळ

तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५ (४) नुसार शासनाने मान्यता देण्याच्या अधिन आदेशाच्या दिनांकापासून पदोन्नती देण्यास मान्यता देत आहे. संबंधित सहा. आयुक्त यांना अलाहिदा कामकाज वाटपाचे आदेश निर्गत करण्यात येतील.

प्रस्तुत आदेशाची नोंद संबंधितांचे सेवानोंद पुस्तकामध्ये घेण्यात यावी.

*सही/-*
*(शेखर सिंह)*
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

प्रति, सर्व संबंधित
प्रत-

१) लेखा विभाग २) लेखापरिक्षण
३) सर्व संबंधित विभाग ४) सामान्य प्रशासन टेबल क्रमांक ९,१०,१२,१४,संगणक कक्ष

२३.१०.२४
सहा. आयुक्त (साप्रवि)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,